दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक १०१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • सोमवार दि.५ जुलै २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# पुढच्या ५ दिवसांत मान्सूनचे कमबॅक ; ९ जुलैनंतर कोकणात जोर वाढणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**राज्यात मान्सूनचे आगमन होताच मुसळधार पावसाने हजेरी लावली. यामुळे अनेक ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण झाली होती. मान्सूनची चाहूल लागताच शेतकऱ्यांनी पेरणीला ही सुरुवात केली. पण आठवड्याभराने आता पुन्हा पाऊस सक्रिय होताना दिसत आहे. आठ ते नऊ जुलैपर्यंत पावसाचं पुनरागमन होईल अशी शक्यता हवामान खात्याने वर्तवण्यात आली.**

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढच्या पाच दिवसात पावसाची शक्यता आहे. सात आणि आठ जुलै रोजी काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. हा पाऊस सामान्यदेखील असू शकतो.

पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि पूर्व विदर्भामध्ये या दोन्ही दिवशी ढगांच्या गडगडाटासह पाऊस हजेरी लावेल अशी शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात



आली आहे.

यामुळे शेतकऱ्यांनी पावसाचा अंदाज घेत पेरणीला सुरुवात करावी आणि दुबार पेरणी करावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. भारतीय हवामान विभागातील वरिष्ठ वैज्ञानिक आणि मुंबई प्रादेशिक हवामान विभागाचे माजी उपमहासंचालक कृष्णानंद होसाळीकर यांनी ट्विट करून आजच्या हवामानाबद्दल माहिती दिली आहे.


पूर्वानुमानानुसार, जुलैच्या पहिल्या आठवड्यातही कोकण विभागात फारसा पाऊस नाही. मराठवाडा, मध्य महाराष्ट्राच्या काही भागात पाऊस पडू शकतो. त्यानंतर २ ते ८ जुलै या आठवड्यामध्ये विदर्भामध्ये तसेच लगतच्या मराठवाड्याच्या काही भागात पावसाची शक्यता आहे. मात्र, याचे प्रमाण ९ ते १५ जुलैच्या आठवड्यात वाढण्याची शक्यता आहे. या काळात राज्यात सर्वदूर पाऊस असू शकेल. तसेच कोकणातही पुन्हा पावसाचा वेग वाढेल असा, अंदाज आहे.

## धबधब्याच्या खोल खड्ड्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील वाजे येथील कुंडी धबधब्यावर आपल्या मित्रांसह वर्षा सहलीचा आनंद घेण्यासाठी गेलेल्या एका तरूणाचा धबधब्याच्या खोल खड्डुयात बुडून मृत्यु झाल्याची घटना आज घडली आहे.

पनवेल तालुका पोलिस ठाणे हद्दीत कुंडी धबधबा येथे आज मुंबई येथील शिवडी परिसरातील ६ मित्र फिरण्यासाठी गेले असता सकाळी ०९.०० वाजेच्या सुमारास एक मित्र नामे मौसिन मुघल वय १९ वर्षे व त्याचा मित्र नामे सिद्धेश संजय माने वय १९ वर्ष या दोघांचा पाय घसरून खाली पडले. यातील सिध्धेश हा एका मुलाचा पाय पकडून वर आला परंतु मौसिन हा कुंडी धबधब्याच्या खोल खड्ड्यात पाण्यात बुडून मयत झाला. मयत मुलास स्थानिक रहिवासी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने बाहेर काढून पनवेल जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले असता तेथे त्याला मयत घोषित केले. मौसेन याचे वडील परदेशात कामाला असून तो एकूलता एक मुलगा होता. कॉलेजच्या कामानिमित्त बाहेर जात असल्याचे सांगून तो घराबाहेर पडला होता. कुंडी धबधब्यात आत्तापर्यंत ११ जणांचा बुडून मृत्यु झाला आहे. त्यातील हे सर्व जण त्यांच्या कुटूंबातील एकूलते एक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.



## पालीतील सरसगड किल्ल्यावरून दरीत पडून तरुण जबर जखमी

### स्थानिक तरुणांनी जीवाची बाजी लावून काढले बाहेर

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पालीतील सरसगड किल्लयावर गेलेला एक तरुण शनिवारी (ता.३) सायंकाळी पायऱ्या उतरतांना पाय घसरून दरीत पडला. जबर जखमी झालेल्या या तरुणाला पालीतील देऊळवाडा व आगर आळी येथील तरुणांनी अथक परिश्रमाने जीवाची बाजी लावून बाहेर काढले. रात्री आठ च्या दरम्यान पाली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तेथून पुढील उपचारासाठी पनवेल येथील रुग्णालयात नेण्यात आले.

निलेश सावंत असे या तरुणाचे नाव असून तो पालीतील रहिवाशी आहे. तो आपल्या २ मित्रांसह किल्लयावर गेला होता. दरम्यान पायऱ्या उरत असतांना पाय घसरून शेजारच्या दरीत कोसळला आणि डोक्याला व इतर ठिकाणी जबर मार लागून बेशुद्ध झाला होता. त्याच्या सोबत असलेल्या सहकार्यांना त्याला वर काढणे शक्य नव्हते. मग येथील तरुणांना ही बातमी कळताच १५ ते २० तरुण किल्यावर गेले. ताबडतोब प्रदीप गोळे व प्रणव रटाटे हे तरुण जोखीम घेऊन दरीत उतरले व दोरी बांधून निलेश सावंत याला वर काढले.

त्यानंतर झोळीत टाकून मिलिंद गोळे, शुभम वरंडे, आर्यन जाधव, सुरज वरंडे, वरून रटाटे, ऋषिकेश वरंडे, केदार वरंडे, अथर्व कडू, ओंकार फाटक, किरण मढवी, केदार मढवी, विघ्नेश मढवी, प्रेषित ठोंबरे, शुभम घाडगे, स्वरूप मढवी, ऋषिकेश ठोंबरे, अमित ठोंबरे, गजानन काटकर, शुभम फोंडे आदी तरुणांनी खाली आणून पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेले. तेथून या तरुणाला पुढील उपचारासाठी पनवेल येथे रुग्णालयात नेण्यात आले आहे. सध्या तो आयसीयू मध्ये उपचार घेत असून प्रकृती स्थिर आहे.



## संक्षिप्त...

### दहिसर ज्वेलर्स : मास्टरमाईंडसह दोघांच्या मुसक्या आवळल्या

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सोनार शैलेंद्र पांडे (४६) यांच्या दुकानात शिरून थेट त्यांना गोळी घालत लुटपाट करा असे सांगत शूटर्सना पाठविणाऱ्या बंटी पाटीदार (२३) याच्यासह त्याचा साथीदार प्रमोद लखरिया (२२) याच्या मुसक्या देखील रविवारी दहिसर पोलिसांनी सुरतच्या पिठमपूर जंगलातुन आवळल्या आहे.

पाटीदार हा हत्या आणि दरोड्याच्या घटनेच्या २५ दिवस आधी मुंबईत आला आणि त्याने रेकी करत मारेकऱ्यांना सर्व प्लॅन समजावला आणि तो मुंबईतून परतला होता. तर त्याचा साथीदार प्रमोद लखरिया याने या सर्वांना शस्त्र पुरविले. तसेच गोळीबार कसा करायचा, दरोडा कसा घालायचा, 'टार्गेट' पर्यंत कसे पोहोचायचे हे सर्व प्रशिक्षण दिल्याचे पोलीस सूत्रांचे म्हणणे आहे.

हे दोघे सुरतमधील पिठमपूर जंगलात लपल्याची माहिती दहिसर पोलिसांना मिळाली. त्यानुसार परिमंडळ १२ चे पोलीस उपायुक्त डॉ. डी एस स्वामी आणि दहिसरचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय मराठे, सहायक पोलीस निरीक्षक डॉ चंद्रकांत घार्गे, ओम तोतावार, सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण निंबाळकर, अभिनय पवार आणि पथकाने सापळा रचत दोघांचा गाशा गुंडाळला. पाटीदारच्याच इशाऱ्यावरून लूट करण्याच्या उद्देशाने पांडेंची हत्या करणाऱ्या आयुष पांडे (१९), निखिल चांडाल (२१), उदय बाली (२१) चिराग रावल (२१) आणि अंकित महाडिक (२१) या पाच जणांना यापूर्वी सुरत जवळून अटक करण्यात आली होती.

त्यानुसार आता याप्रकरणातीला अटक आरोपींची संख्या ७ झाली असुन त्यांची चौकशी पोलीस करत आहेत.

## खालापूर तालुक्यातील विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

खालापूर तालुक्यातील जांबरुंग येथील प्राथमिक शाळेचे अल्टा लॅबोरेटरी प्रा.लि. यांच्या सीएसआर फंडातून नूतनीकरण झालेल्या नूतन इमारतीचे उद्घाटन, घंटागाडीचे लोकार्पण तसेच नित्यानंद इन्फ्रास्ट्रक्चर यांच्या सौजन्यातून मिळालेल्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण काल(३जुलै) रोजी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते संपन्न झाले.

या कामाबद्दल सर्व ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी करोना काळात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या डॉक्टर्स व त्याच्या सहकाऱ्यांचा सन्मान सोहळाही आयोजित करण्यात आला होता. जांबरुंग ग्रामपंचायत परिसर सध्या विकासाच्या मार्गावर वाटचाल करीत आहे. या क्षेत्रात जांबरुंग धरणाचे कामही प्रगतीपथावर आहे. ग्रामपंचायत सरपंच श्री.रमेश खांडेकर हे सर्व सदस्यांना बरोबर घेऊन विकासकामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील आहेत.



ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांची समस्या लक्षात घेऊन अल्टा लॅबोरेटरी प्रा.लि. व नित्यानंद इन्फ्रास्ट्रक्चर या व्यवस्थापनाकडे वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यास अखेर यश मिळाल्याने अल्टा लॅबोरेटरी प्रा.लि. यांच्या सीएसआर फंडातून प्राथमिक शाळा जांबरुंग च्या नूतन इमारतीचे उद्घाटन, घंटागाडीचे लोकार्पण तसेच नित्यानंद इन्फ्रास्ट्रक्चर यांच्या सौजन्यातून मिळालेल्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या हस्ते संपन्न झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. .../२

## पर्यटकांना देवकुंड धबधब्यावर नेले फिरायला ; ९ जणांवर गुन्हे दाखल

**दै.रायगड नगरी । माणगाव**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर, देवकुंड धबधबा परिसरात मनाई आदेश असतानाही ५० ते १०० पर्यटकांना फिरायला घेऊन जाणाऱ्या ९ जणांवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची फिर्याद माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई श्यामसुंदर शिंदे यांनी दिली आहे. माणगाव तालुक्यातील पाटणूस गावच्या हद्दीत असेला देवकुंड धबधबा पर्यटकांना सादर घालतोय. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देवकुंड धबधब्यावर व आजूबाजूच्या १ किमी परिसरात २१ जून ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

असे असताना शनिवारी (३ जुलै) दुपारी एक ते साडेतीन वाजण्याच्या सुमारास बुकींग घेऊन पर्यटकांना देवकुंड धबधबा परिसरात फिरण्यासाठी आणण्यात आले होते. ५० ते १०० पर्यटकांना फिरायला आणून प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करण्यात आले. ही बाब निदर्शनास आल्यानंतर या .../२

## आवळासाठी कोवळा गमवावा लागणार ; शालेय पोषण आहाराचा अजब फतवा

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

महामारीच्या संकटांमध्ये शाळा भरली नसल्याने ऑनलाइन शिक्षणाचे धडे सुरू आहेत. या कालावधीमध्ये शालेय पोषण आहार मुलांना थेट देता आला नाही. मात्र उन्हाळी सुट्टीतील शालेय पोषण आहाराचे धान्य न देता त्याऐवजी रोख रक्कम देण्यासाठी विद्यार्थ्यांना आता राष्ट्रीयीकृत बँकेत खाते काढावे लागणार आहे. राष्ट्रीयकृत बँकेत खाते काढण्यासाठी किमान एक हजार रुपये खात्यात भरावे लागणार आहेत. मात्र एक हजार रुपये खर्च करून पालकांच्या हातात फक्त १५६ रुपये मिळणार आहेत. त्यामुळे आ-वळा मिळवण्यासाठी कोवळा गमवावा लागल्याची भावना पालक वर्गातून होत असून पूर्वीप्रमाणेच पालकांना तांदूळ वाटप करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

कोरोनाच्या संकटात शाळेची घंटा कधी वाजलीच नाही. शाळेमध्ये उपस्थिती चांगली राहावी यासाठी मुलांना शालेय पोषण आहार शासनाने सुरू केला. मात्र उन्हाळी सुट्टीतील शालेय पोषण आहार मुलांना द्यायचा शिल्लक असल्याने आता तो पोषण आहार न देता त्या पोषण आहाराची रक्कम मुलांच्या थेट बँक खात्यामध्ये जमा केली जाणार आहे. यासाठी शिक्षण विभागाने सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे असे संयुक्त खाते काढण्याचे आदेश बजावले आहेत. अगदी काही अल्पावधीतच मुलांची बँक खाती काढण्याचे काम शाळा प्रशासनाला करावे लागणार आहे . ९ जुलै पर्यंत पनवेल तालुक्यातील सर्व अनुदानित शाळा, तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुलांची बँक खाती काढावी लागणार आहेत. पालकांना याबाबत सांगितले असता पालकांनी शासनाच्या या निर्णयाविरोधात .../२



**पावसाची उघडी मिळाल्याने मुरुडमधील वाणदे उंडरगाव येथे लावणीच्या कामाला वेग आला आहेत. (छाया : नितीन शेडगे, मुरुड)**

## साग चोरताना ग्रामस्थांनी रंगेहाथ पकडले तिघांना अटक ; चारजण फरार

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सागाचे झाड तोडून त्याचे ओंडके चोरुन नेताना चोरांना डवाले ग्रामस्थांनी रंगेहाथ पकडले. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, तिघांना अटक करण्यात आली. तर ४ जण फरार आहेत.

अलिबाग तालुक्यातील वरंडे हद्दीतील सुरई येथे इम्तियाज अब्दुलसत्तार पालकर (रा.अलिबाग पालकर वाडी) यांच्या जागेत ही घटना घडली. त्यांच्या तीन साग वृक्षांपैकी दोन सागाचे वृक्ष या चोरांनी तोडले आणि याचे ४ ओंडके चोरुन नेत असताना .../२



## ऑफोह संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आजपासून साखळी उपोषण

**दै.रायगड नगरी । पेण**

प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी ऑफोह संघटनेच्यावतीने पदाधिकारी सोमवारपासून अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषणास सुरुवात करणार आहेत.

अधिसंख्या पदावरील सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी यांना १८ महिन्यांपासून थांबविलेले पेन्शन व इतर लाभ न्यायालयाचे आदे-शाचे करून शासनाने त्वरीत द्यावेत, अधिसंख्या पदावरील कर्मचारी मृत्यू झालेले आहेत. त्यांचे वारसांना १८ महिने पासून थांबविलेले पन्शन व इतर सर्व लाभ शासनाने त्वरीत दयावेत.

अधिसंख्य पदावतील कर्मचारी यांचे थांबावलेली वेतन वाढ, प्रमोशन, सेवा जेष्ठता इत्यादीलाभ शासनाने पूर्वीप्रमाणेच द्यावेत, सेवा समाप्त अधिसंख्य .../२

# मोठे आकडे ; इलाज तोकडे

करोनाची पहिली लाट ओसल्यानंतर भारताच्या आर्थिक उसळीचे जे स्वप्न जगभरातील वित्तसंस्था तसेच अर्थशास्त्र्यांनी पाहिले होते; ते दुसऱ्या लाटेच्या तडाख्याने चक्काचूर झाले आहे. या क्षणी भारत दुसऱ्या लाटेतून बाहेर येतो आहे; असे चित्र निर्माण झाले असले तरी तिसरी लाट येणारच नाही, असे मोजकेच डॉक्टर म्हणत आहेत. उलट, तिसऱ्या लाटेची तयारी करा आणि ती लवकरात लवकर थोपवा, असेच बहुतेकांचे मत दिसते. या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सहा लाख २९ हजार कोटींचे जे पॅकेज जाहीर केले आहे; त्यातून अर्थकारणाला आणि विशेषकरून जगण्याची दोन हात करणाऱ्या कोट्यवधी श्रमिक, सामान्य नागरिकांना नेमका काय दिलासा मिळणार आहे, याचा विचार करायला हवा. सीतारामन यांनाही सगळ्या आकड्यांच्या बेरजा करून पेटाऱ्याचा आकार मोठा दाखविण्याची सवय जडली आहे. ही वरची रक्कम भक्कम वाटली तरी तिच्यात समाविष्ट असणाऱ्या अनेक योजना पुढच्या पाच वर्षांमध्ये आकाराला येणार आहेत. तसेच, अर्थमंत्र्यांनी आठ कलमी कार्यक्रम आहे, असे म्हटले असले तरी त्यातील नवीन कलमे अशी कोणती आहेत? पर्यटन व्यावसायिकांसाठी, भारतीय व्हिसाधारकांसाठी आणि वैद्यकीय सेवासुविधांपैकी काही, इतकेच नवे आहे. गरिबांसाठी अन्नधान्य वितरणाच्या योजनेला मुदतवाढ देणे आवश्यकच होते. या पॅकेजमधील सगळ्यांत महत्त्वाची घोषणा ही उद्योग कर्जांना सरकारने दिलेल्या कर्जहमीची आहे. ही रक्कम एक लाख कोटी दहा हजारांची आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार व करोनाचा फटका पाहता ही रक्कम कमी आहे. या योजनेचा फायदा २५ लाख छोट्या, मध्यम उद्योजकांना मिळू शकेल, अशी अपेक्षा आहे. त्यांची जुनी कर्जे फिटली नसली तरी नवी कर्जे घेण्यात या योजनेमुळे अडथळा येऊ नये. मात्र, करोना काळात भारतीय बँका कशा वागल्या आहेत, याचेही भान अर्थमंत्र्यांनी ठेवायला हवे होते. गेल्या वर्षभरात बँकांमधील ठेवींची रक्कम ९.७ टक्क्यांनी वाढली आहे. या तुलनेत बँकांनी केलेल्या कर्जवाटपाची रक्कम मात्र केवळ ५.७ टक्क्यांनीच वाढली. हे कर्जवाटप याच्या किमान दुप्पट तरी व्हायला हवे होते. असे असताना अर्थमंत्री कशाच्या जिवावर भारतातील बँका नवी कर्जे हिरीरीने देतील, असे गृहीत धरतात? यापेक्षा लघू आणि असंघटित उद्योजकांना थेट भांडवली पुरवठा करण्याची योजना सरकारने आखायला हवी होती. तसे झालेले नाही. अर्थमंत्र्यांनी आरोग्य सुविधांसाठी मोठा निधी दिला आहे. त्याचे स्वागत करायला हवे. तिसऱ्या लाटेचा फटका लहान मुलांना बसणार, असा अंदाज वारंवार व्यक्त केला जातो आहे. या पार्श्वभूमीवर, मुलांसाठी रुग्णशय्या उपलब्ध करून देण्यासाठी २२ हजार कोटींची तरतूद योग्यच आहे. मात्र, या पैशातून देशभरात कायमस्वरुपी बळकट अशी आरोग्ययंत्रणा उभी करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी सामंजस्याने संयुक्त प्रयत्न करायला हवेत. अर्थात, हा अर्थमंत्र्यांचा विषय नाही. यंदा अर्थसंकल्प येऊन गेल्यानंतर सरकारला वारंवार नवनवी पॅकेजे घेऊन यावे लागत आहे. असे पूर्वी कधी झाले नव्हते. मात्र, यातील एक महत्त्वाचा मुद्दा अर्थमंत्र्यांनी अधोरेखित करणे आवश्यक होते. खरेतर, त्यासाठी त्यांनी या घोषणा करताना सोबत आरोग्य मंत्र्यांनाही घ्यायला हरकत नव्हती. भारतीय अर्थकारणाचे चाक वेगाने लसीकरण होत नसल्याने खऱ्या अर्थाने रुतले आहे. भारतीय ग्राहक, उद्योजक आणि छोटे-मोठे लक्षावधी व्यावसायिक कोणत्याही क्षणी उत्साहाने सारे व्यवहार करू शकतील. मागणी आणि पुरवठ्याचे चक्रही काही आठवड्यांत पूर्ववत होऊ शकते. तितकी अंगभूत ताकद भारतीय अर्थव्यवस्थेत आहेच. दुर्दैवाने, देशभरात आज व्यवसाय व प्रवास करण्यासाठी जी मोकळीक हवी; तीच नाही. काही दिवसांपूर्वी देशात लसीकरणाचा वेग अचानक वाढला. पण रेकॉर्ड करून तो परत खाली आला. डॉ. देवी शेट्टी यांनी रोज एक कोटी लसीकरणाचे लक्ष्य साधायलाच हवे, असे म्हटले आहे. तसे होत मात्र नाही. हे लसीकरण आणि अर्थकारणाला मिळणारी गती यांचे थेट नाते आहे. त्याकडेही अर्थमंत्र्यांनी लक्ष द्यायला हवे होते. किंबहुना, लसीकरणाचा वेग आणखी वाढण्यासाठी अधिकची अर्थतरतूद हवी का, असे विचारून ती करायला हवी होती. आज भारतात उद्योजकतेचे आणि व्यवसायांचे हात-पाय बांधले गेले आहेत. ते सोडले तरी अर्थव्यवस्था धावू लागेल. परदेशी पर्यटकांना व्हिसा फी माफीसारख्या सवलती यामुळेच अर्थहीन ठरण्याची भीती आहे. जर करोनाच आटोक्यात आला नाही तर सवलत असूनही पर्यटक भारतात कशाला येतील आणि तेच करोना नसेल तर व्हिसा फीचा बाऊ न करता लाखो पर्यटक भारतात जरूर येतील. त्यातून सेवाक्षेत्राला फार मोठा आधार मिळेल. निर्मला सीतारामन या कायमच उत्तम आकडेवारी सादर करणाऱ्या अभ्यासक वाटतात. अर्थकारणाला त्या पलीकडची व्यापक दृष्टी व दिशा देण्याची खरेतर गरज आहे. ते काम कधी होणार?

# ओबीसी आरक्षण रद्द झाल्याने तेली समाजातर्फे तहसिलदारांना निवेदन

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



२८ मे २०२१ च्या सुप्रीम कोर्टाचे आदेशानुसार रद्द झालेल्या आरक्षणामुळे महाराष्ट्रातील २७ टक्के राजकिय आरक्षण रद्द झाल्याने ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, महानगरपालिका यामध्ये ओबीसी समाजाला जे प्रतिनीधीत्व मिळत होते ते राज्य सरकारने कोर्टाला इंम्पिरिकल डाटा आजपावेतो सादर केला नाही म्हणुन आरक्षण रद्द झाले. हा ओबीसी समाजावर घोर अन्याय झाला. त्याचा निषेध नोंदविण्या साठी तेली समाजाची राज्यस्तरिय संघटना महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतिने दिनांक २ जुलै रोजी महाराष्ट्रभर लाक्षणिक उपोषण करण्यात आले व काही मुख्य मागण्या संदर्भात शासनाचे लक्ष वेधण्यासाठी निवेदन देण्यात आले.

या आंदोलना द्वारे केलेल्या मागण्यांची अंमल बजावणी झाली नाही तर महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या माध्यमातुन ओबीसी समाज रस्त्यावर येऊन तीव्र आंदोलन करेल असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनास पाठींबा म्हणुन माणगांव शहर तेली संघटनेचे अध्यक्ष रमेश चौधरी व सर्व मोरेश्वर रायकर, रविंद्र कुवेसकर, दिलीप जाधव, अजित तार्ले कर, कमलेश जाधव आदी तेली समाज बांधवानी माणगांव तहसिल कार्यालयात जाऊन तेथे उपस्थित नायब तहसिलदार दिवकर यांना हे निवेदन पत्र दिले आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था मधिल रद्द केलेल्या ओबीसी समाजाचे आरक्षण अबाधित ठेवणे करीता आवश्यक इंम्पिरिकल डाटा ताबडतोब सुप्रीम कोर्टात सादर करुन ओबीसी आरक्षणाचा स्थगित आदेश रद्द करावा व केंद्र राज्य सरकार द्वारा ओबीसीची जातिनिहाय जनगणना करुन ओबीसी आरक्षणाचा कायदा संमत करावा. तसेच मंडल आयोग लागू करणे बाबत मागणी होत आहे.

# शिक्षण अभियानात सुधागड मधील राजीप नवघर शाळेची निवड

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान मिशन १०० आदर्श शाळांअंतर्गत ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले गुणवत्तापूर्ण शिक्षण अभियानात रायगड जिल्ह्यामधून सुधागड तालुक्यातील राजीप नवघर शाळेची निवड झाली आहे. त्यामुळे शाळेला विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी तब्बल ३ लाख ६० हजारांच्या भरीव निधीची तरतूद करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यांमधून या अभियानांतर्गत फक्त चार शाळांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये सुधागड तालुक्यातील रा जि प शाळा नवघर, माणगाव तालुक्यातील रा जि प शाळा मुठवली तर्फे तळे, म्हसळा तालुक्यातील रा जि प शाळा खरसई आणि पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील रा जि प शाळा कापडे बुद्रुक या शाळांची निवड करण्यात आली आहे.

या शाळांना अनुक्रमे ३ लाख ६० हजार, ३ लाख २१ हजार, ३ लाख २० हजार आणि ३ लाख १३ हजार इतका निधीची तरतूद करण्यात येणार आहे.

# जेष्ठ पत्रकारांना पेंशन आणि कोविडचा पत्रकार सन्मान योजनेत समावेश करण्याची कर्जतच्या पत्रकारांची मागणी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

महाराष्ट्र शासनाने जेष्ठ पत्रकारांना निवृत्ती वेतन देण्याच्या मागणीसाठी आणि शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण योजनेमध्ये कोविड-१९चा समावेश करण्यात यावा या मागणीसाठी कर्जत तालुक्यातील पत्रकारांनी कर्जत प्रेस क्लबच्या माध्यमातून राज्याच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाच्या राज्यमंत्री अदिती तटकरे यांना निवेदन दिले. दरम्यान,रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष सुरेश लाड यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि अदिती तटकरे यांना याच मागणीसाठी निवेदने दिली आहेत.



राज्य सरकारच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाकडून राज्यातील जेष्ठ पत्रकारांना निवृत्ती वेतन मिळावे अशी मागणी सातत्याने केली जात आहे. या मागणीसाठी कर्जत तालुक्यातील पत्रकारांनी कर्जत प्रेस क्लब च्या माध्यमातून या विभागाच्या राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी भेट घेऊन जेष्ठ पत्रकार विजय मांडे यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले. त्यावेळी रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार आणि माजी मंत्री सुनील तटकरे हे देखील उपस्थित होते. कर्जत तालुक्यातील पत्रकारांचे वतीने देण्यात आलेल्या निवेदनात माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय कडून शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण योजने मधून विविध आजारांवर मात केलेल्या अधिस्वीकृती धारक पत्रकारांना त्यांनी त्या आजारांवर मात करताना रुग्णालयात केलेला खर्च दिला जातो. मात्र त्या योजनेतील आजारांमध्ये कोविड-१९ या आजाराची शासनाने अद्याप समावेश केला नाही. देशात कोविड हा भयानक आजार येऊन दीड वर्षे होत आली तरी कोविड-१९चा त्या आजारांच्या यादीत समावेश नाही.त्यामुळे कोणत्याही अधिस्वीकृती धारक पत्रकारांना शंकरराव चव्हाण पत्रकार सन्मान निधी या योजनेमधून कोविड वर यशस्वीपणे उपचार घेऊन मात करणाऱ्या मदत मिळाली नाही. कोविडचा समावेश शंकरराव चव्हाण पत्रकार सन्मान योजनेत समावेश करण्याची मागणीचे निवेदन माहिती आणि जनसंपर्क विभागाच्या राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी सुतारवाडी येथील कार्यालयात भेट घेऊन दिले.

तर कोविड चा समावेश शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार सन्मान योजनेत करण्यात यावा आणि कोविड या आजारावर मात करणाऱ्या अधिस्वीकृती धारक पत्रकारांना योजनेतून लाभ देण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस रायगड जिल्हा यांच्या वतीने करण्यात आली. रायगड जिल्हा अध्यक्ष माजी आमदार सुरेश लाड यांनी तशा आशयाचे निवेदन माहिती आणि जनसंपर्क विभागाच्या राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी दिले. त्यावेळी उपस्थित असलेले खासदार आणि माजी मंत्री सुनिल तटकरे यांनी शासनाने अधिस्वीकृती धारक पत्रकारांना लाभ दिला पाहिजे आणि त्यासाठी माहिती आणि जनसंपर्क विभागाने अध्यादेश काढायला हवा अशी सूचना केली.

माजी आमदार आणि राष्ट्रवादीचे जिल्हा अध्यक्ष सुरेश लाड यांनी या मागणीचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री आणि माहिती जनसंपर्क विभागाचे कॅबिनेट मंत्री उद्धव ठाकरे तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांना देखील निवेदन देऊन पत्रकारांच्या मागणीसाठी आग्रह धरला आहे.खासदार सुनील तटकरे यांनी आपण स्वतः मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याशी या विषयावर बोलू असे आश्वासन कर्जत तालुक्यातील पत्रकारांना दिले आहे.

# तळा तालुक्यातील नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ सोनसडे करिता मौजे बोरघरहवेली येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील ग्रामीण स्तरापर्यंतच्या विविध शासकीय यंत्रणा बळकट करण्याचा ध्यास घेतला आहे. त्यापैकी पशुवैद्यकीय दवाखान्यांना प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाहीदेखील प्रलंबित होती. मात्र पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या विषयाबाबत गांभीर्याने पावले उचलत पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी शासकीय जमिनी देण्याची कार्यवाही अत्यंत तत्परतेने सुरू केली आहे.

त्याचबरोबर पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी असलेल्या जागांची योग्य निवड व पाहणी करून पशुवैद्यकीय दवाखाने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही सुरू करण्याबाबतीतही त्यांनी जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर तळा तालुक्यातील नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ सोनसडे या इमारतीच्या बांधकामासाठी शासकीय जमिनीची मागणी होती, याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मौजे बोरघरहवेली, ता.तळा जि. रायगड येथील गट.नं.५०७ एकूण क्षेत्र ३-५१-५० हे.आर. पैकी सरकारी क्षेत्र १-११-०० हे.आर.ही पैकी ०.१०.०० हे.आर. जमीन महसूल मुक्त व सारामाफीने ही शासकीय जमीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ सोनसडे करिता हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी नुकतेच जारी केले आहेत. तळा तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला पशुवैद्यकीय सुविधा मिळण्याच्या दृष्टीने हा लोकोपयोगी निर्णय घेण्यात आला आहे.

# महाराज साम्राज्य संघाचा दुसरा वर्धापन दिन उत्सहात साजरा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

महाराज साम्राज्य संघाचा दुसरा वर्धापन दिन निळकंठ पॅलेस मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी रायगड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी यांचे स्वागत करण्यात आले.यानंतर महाराज साम्राज्य संघाच्या कार्यकारणीची निवड करुन त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

यावेळीखा.उदयराजेभोसले,छत्रपतीसंभाजी राजे,यांच्या मार्गदर्शनाखाली,संस्थापक/अध्यक्ष दिलीप नाना सरकार यांच्या अध्यक्षतेखाली, युवराज किरण राजे भोसले, पूजा ताई आदी मान्यवरांच्या उपस्थित राहून पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.व रायगड जिल्हा अध्यक्ष पदी (रायगडचा टायगर )निलेशभाई महाडीक यांची निवड करण्यात आली.

तर रायगड जिल्हा कार्याध्यक्ष सचिन पवार,उपाध्यक्ष रोहित पवार,सचिव ज्ञानेश्वर जगताप, सल्लगार अनिकेत कांबळे,सरचिटणीस राजू सुतार,प्रसिद्धी प्रमुख सिद्धार्थ तांबे,तसेच युवक कार्यध्यक्ष रुपेश मोहिते युवक अध्यक्ष प्रणय वाळंज, उपाध्यक्ष अविनाश भोसले, सरचिटणीस नितेश सुतार, सल्लगार अक्षय खरुसे, सचिव विशाल शेलार,संपर्क प्रमुख नितेश करंजे, सोशल मीडिया रायगड जिल्हा अध्यक्ष शुभम म्हात्रे, उपाध्यक्ष हितेश तांबे, यांची निवड करण्यात आली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## खालापूर तालुक्यातील विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील : ना.आदिती तटकरे

यावेळी करोना काळात जांबरुंग पंचक्रोशीत करोनावर नियंत्रण ठेवण्यासाठी उल्लेखनीय सेवा बजावलेल्या डॉ.राजेश पाटील, डॉ.नितीन पाटील व त्यांच्या सहकारी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी अल्टा लॅबोरेटरी प्रा.लि.च्या संचालिका श्रीमती गिता धोटे, नित्यानंद इन्फ्रास्ट्रक्चरचे नितीन प्रभू, अल्टा कंपनीचे पदाधिकारी श्री.म्हात्रे, माजी आमदार सुरेश लाड, रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे, संतोष बैलमारे, कुमार दिसले, प्रसाद पाटील, पंचायत समिती सभापती वृषाली पाटील, उपसभापती विश्वनाथ पाटील, सदस्य अक्षय पिंगळे, सरपंच रमेश खांडेकर, उपसरपंच संदेश कांबळे, ग्रामसेवक शरदचंद्र पवार, सदस्य भगवान तांडेल, अर्चना गायकर, अनंता मेंगाळ, पदिबाई मेंगाळ, मदन खोपडे, सुचिता पाटील, सोनाली खोपडे, लक्ष्मीबाई वाघमारे, विजय देशमुख, रवी रोकडे, प्रभाकर पाटील, वसंत कर्णिक, गोपीनाथ पाटील, चंद्रकांत खोपडे, किरण हाडप, निलेश दळवी, राजू खांडेकर, राजेंद्र देशमुख व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पर्यटकांना देवकुंड धबधब्यावर नेले फिरायला ; ९ जणांवर गुन्हे दाखल

पर्यटकांची बुकींग घेणार्यो पाटणूस येथील ९ जणांविरोधात माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भादंवि कलम १८८, २६९, २७०, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१(१) म.पो.का.क. ३७(१)(३) १३५ सह साथीचे रोग अधिनियम १८९७ चे २, ३, ४ महाराष्ट्र कोविड १९ विनियमन ११ अन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदर वडते हे करीत आहेत.

## आवळासाठी कोवळा गमवावा लागणार ; शालेय पोषण आहाराचा अजब फतवा

नाराजी व्यक्त करून राष्ट्रीयीकृत बँका कोणतीही फुकट खाते काढत नाही. त्यासाठी किमान पाचशे ते हजार रुपये बँक खात्यामध्ये शिल्लक ठेवावी लागतात व त्यासाठी दोन ते तीन चकरा बँकेत मारावे लागतात .विविध कागदपत्रांची व तांत्रिक जुळवाजुळव केल्यानंतरच बँक खाते नागरिकांच्या पदरात पडत आहे .त्यात मुलांच्या नावासोबत पालकांचे नावाचेही बँक खाते काढावे लागणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड असणे आवश्यक आहे. शासनाच्या आधार कार्ड काढण्याची यंत्रणा बहुतांशी ठप्प झाल्याने हजारो विद्यार्थ्यांचे आधार कार्डच काढली नसल्याने बँक खाते कसे काढावे हा यक्ष प्रश्न पालकांसमोर उभा ठाकला आहे. त्यात शासनाकडून पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना १५६ रुपये तर सहावी ते आठवीच्या मुलांना २३४ रुपये बँक खात्यामध्ये जमा केले जाणार आहेत. तसेच ही योजना कायमस्वरूपी राहणार नाही त्यामुळे पालकांचे बँकेमध्ये हजारो रुपये अडकून राहणार याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे मिळणारी रक्कम आणि होणारा खर्च पाहता पालकांनी बँक खाते काढण्यास नकार घंटाच वाजवली आहे. त्यामुळे शासनाने पूर्वीप्रमाणेच विद्यार्थ्यांना फक्त तांदूळच देण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## साग चोरताना ग्रामस्थांनी रंगेहाथ पकडले तिघांना अटक ; चारजण फरार

डवाले ग्रामस्थांनी त्यांना रंगेहाथ पकडले. वनपाल एम.डी. तावडे यांना घटनेची खबर मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी रेवदंडा पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. डवाले ग्रामस्थ व वनपाल एम.डी. तावडे यांनी घटनास्थळी सापडलेल्या तिघांना पोलिसांच्या ताब्यात दिले. तर चारजण तेथून पळून गेले. हे सर्व महाजने दिवीवाडी येथील राहणारे आहेत. रेवदंडा पोलिसांनी १३ हजार ५०० रुपये किमतीचे चार ओंडके हस्तगत केले आहेत. याप्रकरणी इम्तियाज पालकर यांच्या फिर्यादीवरुन रेवदंडा पोलीस ठाण्यात ७ जणांवर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहायक फौजदार व्ही.के. सरके हे करत आहे.

## ऑफोह संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आजपासून साखळी उपोषण

पदावरील कर्मचारी यांना सेवेत पूर्ववत घ्यावेत, सर्वोच्च न्यायालयाचे बहिरा केस मध्ये पूर्वलक्षी प्रभावाने निर्णय लागू करण्याचा आदेश दिलेला नाही. तरीसुद्धा महाराष्ट्र शासनाने अन्यायकारक अधिसंख्य पदाचे दिलेले दिनांक २१/१२/२०१९ चे आदेश त्वरीत रद्द करावेत. या व इतर मागणी साठी रायगड जिल्हा शाखा ऑफोह मधील सर्व सदस्य, सभासद ५ जुलै पासून लेँीळव-१९ मधिल नियमांचे पालन करून रोज ४ किंवा ५ कर्मचारी जिल्हाधिकारी रायगड कार्यालया समोर साखळी उपोषणास बसणार आहेत याबाबतचे निवेदन रायगड जिल्हा ऑफोह संघटनेचे अध्यक्ष संदेश चोगले व कार्याध्यक्ष मोरेश्वर हाडके यांनी दिले आहे.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९३२१५९२११३/८१०४४७७४०

**ग्रुप ग्रामपंचायत गोंडघर**

**ता.म्हसळा, जि.रायगड ४०२१०५**

**अल्प मुदतीची निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत गोंडघर, ता.म्हसळा, जि.रायगड येथे १५ वा वित्त आयोगा अंतर्गत असलेल्या खालील कामाकरिता अधिकृत इच्छुक ठेकेदाराकडून बंद लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा व दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा किंमत | निविदा स्वीकारण्याची दिनांक व वेळ |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | बंधाऱ्यापासून तळ्यापर्यंत एच.पी. पाईप लाईन ४ इंचाची टाकणे | २,९९,०००/- | २९९०/- | ८/०७/२०२१ सकाळी ११.०० वाजता |

अटी व शर्ती :-

१) कामाची मुदत ६ महिने

२) ना परतावा निविदा फॉर्म शुल्क रु.१००/- राहील.

३) प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा भरावी.

४) निविदा उघडण्याचा दिनांक ०९/०७/२०२१ दुपारी ठिक ३ वा.

५) निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.सरपंच गोंडघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत गोंडघर

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत गोंडघर

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# सर्व मल्टी स्पेशलिस्ट रुग्णालये पॅनलवर घ्यावेत : सुनिता पठारे यांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून १००० वेगवेगळ्या आजारांवर मोफत उपचार केले जातात. परंतु तुलनेत रुग्णालयांची संख्या कमी पडत आहे. त्या पार्श्वचभूमीवर राज्यातील सर्व मल्टी स्पेशलिस्ट रुग्णालय या योजनेच्या पॅनलवर घेण्यात यावेत, त्यासाठी असणाऱ्या अटी आणि शर्ती शिथील कराव्यात अशी महत्वपूर्ण मागणी नवी मुंबई येथील सामाजिक कार्यकर्त्या सुनिता पठारे यांनी केली आहे. त्या यासंदर्भात राज्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांना त्या लवकरच पत्र देणार आहेत.

शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारासाठी सर्व सुविधा असतात असे नाही. कोरोना वैश्विक संकटात जिल्हा उपजिल्हा, त्याचबरोबर ग्रामीण आणि महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये अस-लेली सुविधा चव्हाट्यावर आली आहे. परिणामी सर्वसामान्य रुग्णांना सुद्धा विविध आजारांवर उपचार घेण्यासाठी खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो. परंतु त्या रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करावा लागतो. येथील उपचार पद्धती अत्यंत महागडी असल्याने ती गोरगरीब तसेच सर्वसामान्य रुग्णांच्या खिशाला परवडत नाही. अनेकदा पैशामुळे गरीब कुटुंबातील रुग्णांना उपचार मिळत नाही. त्या अभावी त्यांना आपला प्राण गमवावे लागतात. अशाप्रकारच्या गरीब गरजू रुग्णांना वेगवेगळ्या आजारांवर मोफत उपचार मिळावेत म्हणून आघाडी सरकारने राजीव गांधी जीवनदायी योजना अस्तित्वात आणली. युती सरकारने या योजनेला महात्मा फुले जन आरोग्य योजने असं नाव दिले. डॉ सुधाकर शिंदे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार घेतल्यानंतर ही योजना अधिक लोकाभिमुख केली. त्यामध्ये कमालीची पारदर्शकता आणली. वेगवेगळ्या गंभीर आजारांचा समावेश केला तसेच रुग्णालयांची संख्या ५०० वरून एक हजाराहून केली. कोरोना संकटाच्या काळात उत्पन्नाची मर्यादा कमी करून शंभर टक्के आरोग्य हमी महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून देण्यात आली. कोरोना महामारी रोगाचा त्यामध्ये समावेश करण्यात आला. त्यामुळे अनेकांना या योजनेतून उपचार मिळाले. ते कोरोना मुक्त सुद्धा झाले. दरम्यान ही योजना लोककल्याणकारी असून भविष्यात जास्तीत जास्त रुग्णांना उपचारादरम्यान त्याचा लाभ होणे गरजेचे आहे. सद्यस्थितीला महामारी सुरू आहे. त्यामुळे कोरोना बरोबरच इतर आजारांच्या रुग्णांची संख्या मोठी आहे. तुलनेत महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या पॅनेलवरील हॉस्पिटलांची संख्या कमी पडत आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ घेण्यासाठी अडचणी येत आहेत.

त्या अनुषंगाने राज्यातील नवी मुंबईसह इतर शहरांमध्ये जी मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल आहेत त्या ठीकाणी महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करण्याच्या अनुषंगाने नियोजन करण्यात यावे. त्या रुग्णालयांमध्ये सर्वसामान्य रुग्णांना मोफत उपचार देण्याच्या अनुषंगाने शासकिय पातळीवर प्रयत्न करण्यात यावेत अशी मागणी नवी मुंबई येथील सामाजिक कार्यकर्त्या सुनिता पठारे यांनी केली आहे.

महात्मा फुले जन आरोग्य योजने मध्ये वेगवेगळ्या एक हजार आजारावर उपचार केले जातात. मात्र यादीतील रुग्णालय कमी असल्याने सर्वसामान्य रुग्णांना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी काही प्रमाणात अडचणी येत आहेत. या पार्श्वगभूमीवर रुग्णालयांची संख्या वाढवण्यात यावी प्रत्येक तालुक्यामध्ये जन आरोग्य योजनेचा लाभ मिळणारे हॉस्पिटल असावेत अशा प्रकारचे नियोजन शासकीय पातळीवर होणे गरजेचे आहे अशा प्रकारचे मत सुनिता पठारे यांनी व्यक्त केले आहे.

तालुका तसेच जिल्हा स्तरावर असलेल्या मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल मध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देण्याची तरतूद शासनाने करावी अशा प्रकारची मागणी पठारे यांनी केली आहे. या संदर्भात पारनेर नगरचे आमदार निलेश लंके यांच्या माध्यमातून शासकीय पातळीवर पाठपुरावा केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## संक्षिप्त...

### सरपंच महिलेने गरोदर महिलेला केली मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सरपंच हर्षदा सोमनाथ चौधरी यांनी मालडुंगे येथील सतिचीवाडी मधील महिला बेबी प्रकाश दरवडा याना गरोदरपणासाठी स्वतः कडील पैसे देऊन गाडी करुन त्यांना एमजीएम रुग्णालय, कळंबोली येथे पाठवण्यात आले आहे.

बेबी प्रकाश दरवडा याना ब्लड प्रेशरचा खुप त्रास होत होता व त्यांना हॉस्पिटलमध्ये जायचे होते. मात्र पैसे नसल्याने त्याना अडचण निर्माण होत होती. यावेळी सरपंच हर्षदा सोमनाथ चौधरी आणि ग्रामसेवक धनंजय निकम हे त्यांच्या मदतीसाठी धावून आल्या. सरपंच यांनी पाऊस पडत असताना बाईकवर जाऊन तात्काळ सतीची वाडी गाठली आणि त्यांच्या सासूबाई यांना याविषयी कळवले व स्वत:कडील पैसे देऊन त्याची गाडी करुन बेबी याना लगेच एमजीएम रुग्णालय, कळंबोली येथे पाठवण्यात आले. त्यानी सरपंच, सोमनाथ गुरुजी, अशा जाधव, रंजना घुटे यांचे आभार मानले आहेत.



### उद्योगाबरोबरच कामगारांची भरभराट झाली पाहिजे : अ‍ॅड.अनिल ढुमणे

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

कामगारांचे प्रश्न योग्य पद्धतीने मार्गी लावण्याचे प्रयत्न भारतीय मजदूर संघ करेल. आम्ही कोणाच्या विरोधात विरोध म्हणून काम करत नाही. एक सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काम करत असतो. उद्योग चालला पाहिजे. उद्योग टिकला पाहिजे. उद्योगाबरोबरच कामगारांची भरभराट झाली पाहिजे. ही आपली भूमिका आहे. एकीकडे उद्योगाची भरभराट होते पण कामगारांकडे दुर्लक्ष होत आहे. हे आपण कडुन खपवून घेतले जाणार नाही. धाटाव औद्योगिक क्षेत्रात भारतीय मजदूर संघाचे अनेक युनिट स्थापन करण्यात आले आहे.भारतीय मजदूर संघ कोणत्याही राजकीय पक्षाशी बांधलेला नाही.बिगर राजकीय कामगार संघटना आहे.परंतु जे जे कामगारांना सहाय्य करतील त्यांचे सहाय्य घेणे व आपल्या कामगारांचे प्रश्न सोडविणे ही आपली भूमिका आहे असे भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अँड.अनिल ढुमणे यांनी धाटाव औद्योगिक क्षेत्रातील मझदा कलर्स लिमिटेड या कारखानातील कामगारांनी स्विकारलेल्या भारतीय मजदूर संघ या कामगार संघटनेच्या नाम फलक अनावरण प्रसंगी व्यक्त केले.

## म्हसळ्यात महागाई विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसने केला केंद्र सरकारचा निषेध



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

केंद्र सरकारने घरगुती गॅस तसेच पेट्रोल, डिझेल सारख्या वस्तूंची केलेल्या दरवाढी विरोधात देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून शनिवारी म्हसळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. तालुका अध्यक्ष समिर बनकर यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसील के. टी. भिंगारे यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी सभापती छाया म्हात्रे, रायगड जिल्हा परिषदेचे कृषी सभापती बबन मनवे, उपसभापती संदिप चाचले, संतोष (नाना)सावंत, रेशमा कानसे, किरण पालांडे, अनिल बसवत, रियाज घराडे, चंद्रकांत कापरे, सतिश सावंत आदि मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना तालुका अध्यक्ष समीर बनकर यांनी समिर बनकर यांनी सांगितले कि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते तथा राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना याबात निवेदन दिले आहे.

केंद्र सरकारने नेहमीच महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसली असून नेहमीच महाराष्ट्राला सापत्न वागणूक मिळत असल्याचे समिर बनकर यांनी सांगितले.

## उरण तालुका कृषी अधिकारी यांच्या वतीने बेलोंडेखार येथे कृषी दिन साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील बैलोंडखार येथेव तालुका कृषी अधिकारी यांच्या वतीने कृषी दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात तूर बियाणे वाटप, शेतकरी मासिक वाटप, भाजीपाला किट वाटप करण्यात आले व कार्यक्रमात कृषी संजीवनी मोहीम समारोप राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे थेट प्रक्षेपण लॅपटॉप वर दाखवण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी पंचायत समिती सदस्या सौ दिशा पाटील, तालुका कृषी अधिकारी शर्मिला जाधव मॅडम, वेश्वि ग्रामपंचायतीचे सरपंच संदीप कातकरी, उपसरपंच सौ सोनाली पाटील, कृप कदमसो, ढवळसो, घरतसो, श्रीम विभा चव्हाण यांच्यासह सर्व कृस, महिला बचत गट, कृषिमित्र व शेतकरी उपस्थित होते. शेवटी वृक्ष रोपणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**सा.बां.विभाग, पनवेल-४१०२०६**
**ई-निविदा सूचना क्र.२९ सन २०२१-२२**
**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ ईमेल-** panvel.ee@mahapwd.com **फॅक्स नंबर ०२२-२७४६७४४०**

महाराष्ट्र शासन

**जा.क्र.पनवेल/लेशा/निविदा/२०२३** **दिनांक : २८/०६/२०२१**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, पनवेल दूरध्वनी/फॅक्स क्रमांक ०२२-२७४५२७७८/०२२-२७४६७४४० महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून कंत्राटदाराला खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पनवेल यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रु.लक्ष) | अनामत रक्कम | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत जीएसटी धरुन | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कामाचे लेखाशिर्षक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रा.पं.मोठे वेणगाव मौजे मोठे वेणगाव बौद्धवाडा येथे मेन रोड ते बौद्धवाडा अंतर्गत रस्ता तयार करणे, ता.कर्जत, जि.रायगड | १२.७९ | १३०००.०० | वर्ग-६ व त्यावरील | ६००.०० | ०६ महिने | २५१५-आमदार निधी |
| २ | ग्रा.पं.शिरसे हद्दीतील मौजे तमनाथ येथील शिवमंदिर ते तमनाथ गाव रस्ता तयार करणे व संरक्षण भिंत बांधणे, ता.कर्जत, जि.रायगड | १९.८६ | २००००.०० | वर्ग-५ अ व त्यावरील | ६००.०० | ०६ महिने | २५१५-आमदार निधी |
| ३ | जिल्हा न्यायालयात पाण्याची टाकी बसविणे, ता.कर्जत, जि.रायगड | १३.१२ | १४०००.०० | वर्ग-६ व त्यावरील | ६००.०० | ०६ महिने | २०५९-आमदार निधी |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०९/०७/०२१ ते दिनांक १५/०७/२०२१

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक १९/०७/२०२१

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, पनवेल यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

१) सर्वपात्र / इच्छुक निविदाकारांनी निविदा पत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणाली https://mahatenders.gov.in

२) निविदाकारांवर नमूद केलेल्या संकेत स्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात DSC डिजीटील प्रमाणपत्र वितरित व Portal वर Enrollment करण्यासंदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

Toll Free No : 1800 3070 2232, Email : eproc.maharashtra.gmail.com
cppp-support@nic.in

३) निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा/बयाणा रक्कम, ई-निविदा संचाची किंमत याबाबतचे दस्ताऐवजाच्या मुळप्रती स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगून ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभाग हाता येणार नाही.

४) सादर केलेल्या निविदा कागदपत्राची प्रत : स्वतंत्र पाकिटात दिनांक १५/०७/२०२१ रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावी.

५) शासन निर्णयानुसार निम्नत्तम निविदाकारांचा (L-1) कमी दराबाबतचा (Performance Security) चा DD/FDR/B.G. लिफाफा क्र.२ (Financial Bid) उघडल्याचा दिनांकापासून ८ (आठ) दिवसांच्या आत या कार्यालयात सादर करण्यात यावा. सादर न केल्यास निम्नत्तम निविदाकारांची (L-1) इसारा रक्कम (EMD) शासन जमा करण्यात येईल व सदर निविदाकारास पूर्ण एक वर्षासाठी कोणत्याही निविदा प्रक्रियेस सहभागी होता येणार नाही. तसेच अशा निविदा नव्याने मागविण्यात येतील.

६) इतर अटी व शर्ती ई-निविदामध्ये पहावयास मिळतील.

७) सदर कामाची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

८) वरील कामाची ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

## पनवेलकरांना आवडतो १ नंबर, फॅन्सी नंबरसाठी मोजतात ४ लाख रूपये

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लाखमोलाचे वाहन खरेदी केल्यानंतर तितक्याच लाखमोलाचा त्याला नंबरही असावा, असे प्रत्येकाला वाटते आणि त्यामुळेच पनवेल परिसरात वाहन खरेदीबरोबरच फॅन्सी नंबरलाच जास्त पसंती मिळत आहे. त्यामुळे कोरोनाच्या संकटकाळातही वाहन खरेदी काहीशी रोडावली असली तरी 'लकी' नंबरसाठीचे प्राधान्य कमी झालेले नाही. यामुळे आरटीओ विभागालाही चांगला महसूल मिळत आहे.

पनवेल आरटीओ कार्यालयांतर्गत पनवेल , उरण, खालापूर, कर्जत या चार तालुक्यांचा समावेश होतो. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे गाड्यांची विक्री कमी झाली असल्याचे दिसून येत आहे. वाहनाबरोबरच चांगला क्रमांक असावा, यासाठी प्रत्येकजण प्राधान्य देत असतो. त्यातही नवीन वाहनासाठी सात, नऊ अथवा अकरा अंकी बेरीज येईल, असा क्रमांक मिळवण्यासाठी वाहन चालकाकडून प्रयत्न केले जातात. यासह अनेकजण अंकशास्त्राचा आधार घेऊन चांगला क्रमांक मिळवतात. कोरोनामुळे दीड वर्षांपासून परिस्थिती बिघडलेली असतानाही चांगला क्रमांक मिळवण्यासाठी अनेकजण रितसर अर्ज करून व शासनदरबारी त्याला निर्धारित केलेली फी भरून क्रमांक मिळवत आहेत. आरटीओ कार्यालयामार्फतही नवीन सिरीयल सुरू होताच लकी क्रमांकासाठीची लिलाव प्रक्रिया राबवली जात आहे. यामुळे वाहनधारकांना चांगला क्रमांक मिळवल्याचे समाधान मिळत आहे तर शासनाकडेही मोठ्या प्रमाणात महसूल जमा होत आहे.

प्रशासनातर्फे नवीन सिरीयल सुरु होताच पसंती क्रमांकासाठी वाहन चालकाला अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येते. दिलेल्या मुदतीत आलेल्या अर्जानुसार विहीत शुल्क भरून नंबर अदा केले जातात. मात्र, एकाच क्रमांकासाठी जादा अर्ज आल्यास लिलाव प्रक्रिया होते. लिलाव प्रक्रियेत जो वाहनधारक सर्वाधिक बोली लावेल त्याला तो नंबर दिला जातो. या प्रक्रियेतून शासनाला चांगला महसूल प्राप्त होतो.

गेल्या दीड वर्षांपासून सुरु असलेला कोरोनाचा कहर थांबण्याचे नाव घेत नाही. अशा परिस्थितीत वाहन विक्रीवरही परिणाम झाला आहे. लॉकडाऊनमुळे वाहनविक्री करणारे शोरुम बंद असल्यानेही विक्री घटण्याबरोबरच आरटीओकडील वाहनांची नोंद कमी झाली आहे. अशा स्थितीतही खरेदी केलेल्या वाहनांसाठी फॅन्सी नंबर मिळावा, यासाठी बहुतांशजण उत्सुक आहेत.

फ़ैन्सी नंबरप्लेटमधून मिळालेले उत्पन्न एप्रिल २०१९- ते मार्च २०२०-४कोटी, ६८ लाख, ४० हजार ५००, एप्रिल २०२०- ते मार्च २०२१-३ कोटी ८६ लाख, ५३ हजार, एप्रिल २०२१- ते मे २०२१ - १३ लाख ८६ हजार ५०० रुपये

> वाहनाचे ऑनलाइन रजिस्ट्रेशन सुरू केलेले आहे. महसूलात तात्पुरती तुट आहे ती लवकरच भरून निघेल. विशिष्ट व्हिआयपी क्रमांकाची आवड असणाऱ्यांकडून मागणी आल्यानुसार क्रमांक उपलब्ध करून दिला जातो.
>
> **-अभय देशपांडे- प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल**

## ओबीसी समाज आरक्षण स्थगिती रद्द करण्यासाठी तैलिक महासभेच्या रोहा शाखेच्या वतीने निवेदन सादर

**दै.रायगड नगरी । वाकण**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामधील रद्द करण्यात आलेले ओबीसी समाजाचे आरक्षण कायम ठेवण्यासाठी आवश्यक एम्पीरिकल डाटा ताबडतोब सुप्रीम कोर्टात सादर करून ओबीसी आरक्षण आरक्षण स्थगितीचा आदेश रद्द करावा, राज्य व केंद्र सरकारच्या वतीने ओबीसींची जातीनिहाय जनगणना करून ओबीसी आरक्षणाचा कायदा संमत करावा, तसेच मंडळ आयोग लागू करावा अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने शासनाकडे करण्यात आली आहे.

याबाबत तैलिक महासभेच्या रायगड जिल्ह्यातील सर्व तालुका शाखांच्या वतीने सर्व तहसीलदारांना निवेदने देण्यात येत असून याचाच एक भाग म्हणून तैलिक महासभेच्या रोहा तालुका शाखेच्या वतीने रोहा तालुक्याच्या तहसीलदार कविता जाधव यांना नुकतेच एक निवेदन देण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश प्रांतिक तैलिक महासभेचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष किरण काळे, रोहा तालुका अध्यक्ष संतोष कोते, विनायक पवार, मोहन पावस्कर, हेमंत तारलेकर, राजेंद्र वाचकवडे, प्रथमेश काळे, सिद्धेश काळे, उमेश शेडगे आदी पदाधिकारी व सदस्यांसह रोहा, नागोठणे व कोलाड येथील इतर तेली समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे / जमीन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| कोयनावेळे | २/७ | ०-१६-२० | १.१२ |
| **पैकी दुसरेपक्षी यांचा अविभाज्य हिस्सा ०.०८.१० पैकी अविभाज्य हिस्सा ०.०१.६२ गुंठे या जमीन मिळकतीचे** | | | |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक / भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच १) सौ.वैशाली वसंत कदम, २) विजेता वसंत कदम उर्फ सौ.विजयता अविनाश केणे, ३) कु.विशाखा वसंत कदम यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर व्यवहाराबाबत वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षिस, वारसा हक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यु अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसापर्यंत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणचीही हरकत नोंदविली नाही तर वर नमूद केलेला व्यवहार पूर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०३/०७/२०२१

**सही/-**
**अ‍ॅड.विनोद जी.ठाणगे**
**गाळा नं.१००, पनवेल म्यु.शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय सा.बां.विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**
**ईमेल-** panvel.ee@mahapwd.com
**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स नंबर ०२२-२७४६७४४०**
**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र.२९ (ई-निविदा) सन २०२१-२२**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दूरध्वनी क्र.०२२-२७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील कंत्राटाराला योग्य त्या कामांकरिता बी-१ नमुनयातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविण्यात येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप : या निविदेमध्ये एकूण ०३ काम समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०९/०७/२०२१ सकाळी १०.०० ते दिनांक १५/०७/२०२१ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

www.mahatenders.gov.in
ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/२०३३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक : २८/०६/२०२१
क्र.जिमाका/राअ/जाहि/६०/२०२१/२२

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां.विभाग, पनवेल**

# संक्षिप्त...

## लुटमार करणाऱ्या तीन आरोपींना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका गाळ्यामध्ये झोपलेल्या व्यक्तीला आतमध्ये घुसून मारहाण करून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन व कपाटातील रोख रक्कम चोरुन नेल्या प्रकरणी खांदेश्वार पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे.

नवीन पनवेल सेक्टर १३ अयप्पा मंदिर समोरील ए टाईप येथील एका गाळ्यामध्ये त्रंबक दहातोंडे हे झोपले असताना यावेळी तीन आरोपींनी बाहेरुन त्यांचा दुकानातील शटर वाजविले. त्यानंतर दहातोंडे यांनी शटर उघडताच आरोपींनी आत घुसून त्यांना मारहाण करून जखमी केले. तसेच त्यांच्या गळ्यातील १ लाख २० हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन व रोख रक्कम ४५ हजार चोरुन नेले होते. याबाबतची तक्रार खांदेश्वयर पोलीस ठाण्यात करताच वपोनि देवीदास सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे व त्यांच्या पथकाने आरोपी शहानवाझ मोहम्मद अस्लम शेख उर्फ शानू, सहमद अमरजित अंन्सारी व रोशनकुमार गटरु नट यांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

## उरण तालुक्यातील दासबोध सदस्यांचा वृक्ष संवर्धनाचा उपक्रम जोमाने वाढीस

**दै.रायगड नगरी । उरण**

डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यातील दासबोध सदस्यांनी मागील सात वर्षापूर्वी चिरनेर – पनवेल रस्त्यावरील रानसई फाट्यासमोर, टाकीगाव बस थांब्याजवळ १० एकर वनक्षेत्रात सुमारे साडेपाच हजार वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला होता.

सदरची वृक्षे आत्ता जोमाने वाढू लागली असून,त्या ठिकाणी यंदा पावसाळ्यात वाढलेले गाव आणि झुडपे साप करण्यासाठी तालुक्यातील दासबोध सदस्यांनी मोहीम राबविली आहे.

उन्हाळ्यात याच साडेपाच हजार झाडांना पाणी घालण्यासाठी आणि पावसाळ्यात या वृक्षांचे संवर्धन योग्यतेने करून झाडांची वाढ अधिक क्षमतेने होण्याच्या दृष्टीने झाडांच्या आजूबाजूचे गवत व झुडपे काढण्यासाठी दर रविवारी या वृक्ष लागवड करण्यात आलेल्या वनक्षेत्रात तालुक्यातील विविध गावातील दासबोध सदस्य नित्यनेमाने उपस्थित राहून येथील वृक्षांची मशागत करीत आहेत. त्यामुळे येथील वृक्षारोपण करण्यात आलेल्या वनक्षेत्रामध्ये पक्षांची किलबिल मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे.

काल ४ जुलै २०२१ रोजी तळपल्या उन्हातही येथील दासबोध सदस्य अधिक मेहनत घेत आहेत.या त्यांच्या मेहनतीमुळे वाढलेल्या वृक्षामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जाऊन मागील दीड वर्षांपासून देशभरात सुरू झालेल्या कोरोनाच्या महामारीमुळे सर्वत्र ऑक्सिजनचा तुटवडा जाणवत असून, आपल्याला ऑक्सिजन मिळण्यास मोठ्या प्रमाणात मदत होत आहे.त्यामुळे या उरण तालुक्यातील टाकीगाव बस थांब्या जवळील वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मोहिमेचे सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून,समाधान व्यक्त केले जात आहे.

# पार्किंगची अपुरी व्यवस्था :वन संरक्षक समिती ; वनखात्याचे दुर्लक्ष

### माथेरानमध्ये मोटार वाहनांच्या लांबच लांब रांगा



**दै.रायगड नगरी । माथेरान**

दोन महिन्यांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर दि.२६ जून पासून माथेरानची टाळेबंदी उठविण्यात आली आहे त्यामुळे केवळ पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. पावसाळ्यात माथेरानची नेरळ ते माथेरान दरम्यान मिनिट्रेन सेवा चार महिने बंद असते त्यामुळेच एकमेव असणाऱ्या या घाटमार्गावरून मोटार वाहनांची रेलचेल सुरू असते. लॉक डाऊन काळात पर्यटकांना प्रवेश बंदी घालण्यात आली होती त्यामुळे स्थानिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले होते. केव्हा एकदा हे लॉक डाऊन उठते याच प्रती–क्षेत असणाऱ्या स्थानिकांना नुकताच आठ दिवसांपूर्वी पर्यटकांना प्रवेश देण्यात आल्यामुळे सर्वांनाच चांगल्या प्रकारे व्यवसाय निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे.

परंतु मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावर वनखात्याच्या आणि वन संरक्षक समितीच्या माध्यमातून वाहन कर आकारणी चांगल्या पद्धतीने होत असताना ही समिती आणि वनखात्याचे अधिकारी पार्किंग बाबतीत नेहमीच दुर्लक्ष करीत आहेत.येणाऱ्या वाहनांची देखभाल अथवा गाड्यांची चोरी वा काही नुकसान झाले तर याची सर्वस्वी जबाबदारी सुध्दा घेतली जात नाही. एमएमआरडीए मार्फत या ठिकाणी पार्किंग साठी मोठया प्रमाणावर निधी खर्च करण्यात आला आहे परंतु योग्य नियोजन नसल्यामुळे इमारतीच्या सर्व प्रकारच्या साहित्यानी त्याचप्रमाणे गावाची जी काही विकास कामे होत आहेत त्यासाठी लागणारे जांभा दगड वगैरे यांनी हा बहुतांश भाग व्यापलेला दिसत आहे त्यामुळे एवढा निधी खर्च करून सुध्दा वाहने पार्क करण्यासाठी जागा उपलब्ध होत नाही.

लॉक डाऊन नंतर पहिल्याच शनिवारी या सुट्टीच्या दिवशी दस्तुरी नाक्यावर वाहनांची संख्या वाढली होती त्यामुळे कित्येक गाड्या या तिसऱ्या वळणापर्यंत घाटात लावण्यात आल्या आहेत आणि तेथून एक ते दीड किलोमीटरची सामान घेऊन पर्यटकांनाआपल्या लहान लहान मुलांना घेऊन पायपीट करावी लागत आहे.

तर बहुतेक गाड्या ह्या जागेअभावी माघारी गेल्या आहेत याचा इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे. आणि वन समितीच्या उत्पन्नात सुध्दा गाडया माघारी जात असल्याने तोटा सहन करावा लागणार आहे. या ठिकाणी पॅनोरमा पॉईंट कडे जाणाऱ्या रस्त्या कडे गाड्या पार्क केल्या जातात परंतु हा भाग सुध्दा बंद करण्यात आला आहे तर माउंट बेरी या पॉईंट जवळ सुध्दा अनेक गाड्यांची पार्किंग उपलब्ध होऊ शकते. परंतु वनखात्याच्या आणि वन समितीच्या अयोग्य नियोजनाच्या अभावामुळे नाहक त्रास येणाऱ्या पर्यटकांना सहन करावा लागत आहे.

नगरपरिषद सुध्दा वाहन कर आकारणी करत आहेत त्यामुळे नगरपरिषदेच्या अधिकारी वर्गाने त्याचप्रमाणे वनखात्याच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाने सदरची बाब गांभीर्याने घेऊन पर्यटकांना होत असलेल्या अडचणींवर लवकरात लवकर पर्याय उपलब्ध करून घ्यावा अशी मागणी केली जात आहे.

> सध्या माथेरान शहराच्या हद्दीत माथेरान नगरपरिषद व एमएमआरडीची जी विकासकामे चालू आहेत त्याकरिता लागणार मटेरियल हे पाच ट्रान्सपोर्ट व एमएमआरडीएच्या ठेकेदाराचे अस सर्व अस्ताव्यस्त आहै वारंवार सुचना करून देखील ते ऐकण्याच्या मनःस्थितीत नाही त्यामुळे किमान १०० गाडी चे पार्किंग अडविले आहे तसेच माथेरानकर व हॉटेलिअर्स यांच्या स्वतः च्या मालकीच्या गाडयामध्ये पूर्वीच्या प्रमाणात वाढ झाली असून त्या जेमतेम २०० आहेत तसेच एमपी ९३ प्लॉट व आजुबाजूच्या परिसराचा मालवाहतूक घोडेवाल्याकडून सरास वापर या सर्व गोष्टी पार्किंग फक्त ३०० ते ३५० गाड्या आल्या कि फूल होणेस कारणीभूत आहे यामध्ये माथेरान नगरपालिका व वन विभाग कारवाई करणेस हतबल आहेत.
>
> **योगेश जाधव -अध्यक्ष वन संरक्षक समिती, माथेरान**

> लॉकडाऊनमध्ये घरात बसून बसून आमचे कुटुंब खूपच कंटाळून गेले होते. आमचे आवडते ठिकाण म्हणजे नेहमीचेच माथेरान आहे. सुट्टी असल्याने आम्ही आज गाडी घेऊन इथे आलो तर जवळजवळ तिसऱ्या टर्न वर आमची गाडी उभी करायला लागली एवढया गाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. निदान इथल्या संबंधित अधिकारी, कर्मचारी वर्गाने सुट्टयांच्या हंगामात तरी पार्किंगची व्यवस्था चांगल्या प्रकारे करावी जेणेकरून कुणालाही माघारी जायची वेळ येता कामा नये हीच अपेक्षा.
>
> **पी. एच.उपाध्याय, पर्यटक मुंबई**

## देहरंग धरणाच्या परिसरात फिरायला येणाऱ्या पर्यटकांना आवर घालण्याची मनसेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील मालडुंगे ग्रामपंचायत हद्दीमध्ये पनवेल महानगरपालीकेला पाणी पुरवठा करणारे देहरंग धरण आहे. सदर परिसरात पर्यटक मोठ्या प्रमाणात फिरायला येत आहेत. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता त्यांच्यापासून स्थानिक नागरिकांना संसर्गाचा धोका निर्माण होवू शकतो. तसेच पर्यटक कोरोनाचे नियम पाळत नाहीत. त्यामुळे देहरंग धरणाच्या परिसरात फिरायला येणाऱ्या पर्यटकांना आवर घालण्याची मागणी मनसेचे विभाग अध्यक्ष विश्वास पाटील आणि उपतालुका अध्यक्ष दिनेश मांडवकर यांनी तालुका पोलिसांकडे केली आहे.



काही पर्यटक मदनप्राशन करून चारचाकी वाहनातील म्युझिक सिस्टीम चालु करूज बेधुंदपणे गाण्यावर नाचत असतात व मदयप्राशन करून बेजबाबदारपणे वाहने चालवतात. त्यामुळे या परिसरात बरेचसे अप–घात घडतात. धरण परिसरात बरेचसे फार्म हाऊस अहेत. ते रात्री अपरात्री मद्यप्राशन करून गाण्याच्या आवाजावर जोरजोरात नाचणे चालू असते. त्यामुळे येथील स्थानिक नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. काही अविवाहीत प्रेमीयुगल रात्री आठ–नऊ वाजेपर्यंत फिरत असतात. त्यामुळे अनुचित प्रकार घडु शकतात. धरण आणि धरणाच्या परिसरातील नद्यांमध्ये पोहताना पाण्याचा अंदाज न आल्यामुळे बऱ्याच पर्यटकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत त्यामुळे याठिकाणी येणाऱ्या पर्यटकांवर बंदी घालण्याची मागणी मनसेचे विभाग अध्यक्ष विश्वास पाटील आणि उपतालुका अध्यक्ष दिनेश मांडवकर यांनी केली आहे.

### फायनान्स कंपन्यांची मुजोरी वाढली...

## हफ्ता भरला नाही म्हणून महिलेला फायनान्स कंपनीकडून फोनवरून शिवीगाळ व दमदाटी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील नाणोसे येथील एका महिलेला मोबाईलचा हफ्ता भरला नाही म्हणून फायनान्स कंपनीकडून बुधवारी (ता.३०) फोनवरून शिवीगाळ व दमदाटी करण्यात आली आहे. यासंदर्भात पाली पोलीस स्थानकात अनोळखी महिलेविरोधात गुरुवारी (ता.१) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाणोसे येथील एकनाथ गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांनी बजाज फायनान्स कंपनीकडून लोनवर ओप्पो कंपनीचा मोबाईल घेतला आहे. त्याचा हप्ता ते दर महिन्याला भरतात. मात्र बुधवार दिनांक ३० रोजी त्यांना बजाज फायनान्स कंपनी पुणे येथून मोबाईलचा हप्ता भरण्यासाठी फोन आला होता.

परंतु हा फोन त्यांची पत्नी दिपिका गायकवाड यांनी उचलला असता बजाज फायनान्स कंपनी मधून एका अनोळखी महिला व्यक्तीने दिपिका यांना शिवीगाळ करून हप्ता भरण्याकरिता उशीर का केला म्हणून दमदाटी केली. या संदर्भात एकनाथ गायकवाड यांनी पाली पोलीस स्थानकात मोबाईल नंबर क्रमांकावरील अनोळखी महिलेविरोधात तक्रार दाखल केली आहे.

## महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रद्द केलेल्या ओबीसी समाजाचे आरक्षण अबाधित ठेवण्याकरीता पनवेल तहसीलदारांना दिले निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रद्द केलेल्या ओबीसी समाजाचे आरक्षण अबाधित ठेवण्या करीता आवश्यक इम्पिरिकलडाटा ताबडतोब सुप्रीम कोर्टात सादर करून ओबीसी आरक्षणाचास्थगिती आदेश रद्द करावा व केंद्र/राज्य सरकार तर्फे ओबीसींची जातनिहाय जनगणना करून ओबीसी आरक्षणाचा कायदा संमत करावा. तसेच मंडल आयोग लागू करावा या बाबत महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा अध्यक्ष कोकण विभाग सतीश वैरागी आणि समाजबांधवांनी पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांच्या कडे निवेदन दिले .

सुप्रीम कोर्टाने दि.२८ मे २०२१ रोजी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीबाबत ओबीसींचे आरक्षण रद्द ठरविल्याचा आदेश दिला आहे. त्या आदेशानुसार महाराष्ट्रातील ओबीसी समाजाचे २७ टक्के राजकीय आरक्षण हे रद्द झालेले आहे.



त्यामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद, नगरपरिषदव महानगरपालिका यामध्ये ओबीसी समाजाला जे प्रतिनिधित्व मिळत होते ते राज्य सरकारने कोर्टाला इम्पिरिकलडाटा आजपर्यंत सादर केला नाही. म्हणून सदर आरक्षण रद्द केले आहे.

हा ओबीसी समाजावर घोर अन्याय झालेला आहे. त्याचा निषेध नोंदविण्यासाठी तेली समाजाची राज्यस्तरीय संघटना महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने आम्ही महाराष्ट्रभर लाक्षणिक करत असून या निवेदनाद्वारे आम्ही आमच्या मागण्यांकडे आपले लक्ष वेधत असल्याचे तहसीलदार तळेकर यांना दिलेल्या निवेदनात म्हंटलेआहे. या वेळीप्रिया डिंगोरकर, शुभांगी खळदे, सुनीता किर्वे, प्रज्ञा धोत्रे, गजानन शेलार, गणेश महाडीक, गणेश धोत्रे, तुकाराम किर्वे, रमेश जगनाडे, नितीन खानविलकर, प्रशांत रहाटे आणि इतर समाज बांधव या वेळी उपस्थित होते.

## पेणचे सहाय्यक फौजदार अविनाश म्हात्रे सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । पेण**

रायगड जिल्ह्यासह पेण तालुक्यामध्ये अनेक प्रसंगांत तणावग्रस्त जमावाला आपल्या संयमी स्वभावाने शांत करून त्याला प्रसंगावधानातून बाहेर काढण्याचे कसब असणारे पेण पोलिस ठाण्याचे कर्मचारी अविनाश दामोदर म्हात्रे सहाय्यक फौजदार म्हणून सेवानिवृत्त झाले.



१२ जानेवारी १९८४ मध्ये नेरळ पोलीस ठाण्यात त्यांनी हव–ालदार म्हणून पोलीस खात्यातील सेवेस प्रारंभ केला. ३७ वर्षाच्या कारकिर्दीत अलिबाग, महाड, बोरघाट या ठिकाणी सेवा करीत शेवटी पेण पोलीस ठाण्यात सहाय्यक फौजदार म्हणुन ते निवृत्त झाले. त्यांच्या पत्नी प्रिती म्हात्रे यासुद्धा पोलीस सेवेत कार्यरत होत्या. त्याही सहाय्यक फौजदार म्हणून २ वर्षांपूर्वी निवृत्त झाल्या आहेत. त्यांचा ज्येष्ठ पुत्र किरण म्हात्रे हा इंडियन नेव्हीत कार्यरत होता. सध्या तो हिरे कंपनीत कामाला आहे. दुसरा मुलगा चेतन म्हात्रे हा डॉक्टर असून सुनबाई सुप्रिया चेतन म्हात्रे यासुद्धा डॉक्टर आहेत.

पेण पोलीस ठाण्यात अविनाश म्हात्रे यांचा सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष पिंपळे यांनी शाल व पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी संतोष पिंपळे यांनी सांगितले की, संपूर्ण कारकिर्दीत आपल्या वर्दीवर कोणताही डाग न पडू देता पोलिस आणि नागरिक यांच्यातील एक उत्तम दुवा म्हणून म्हात्रे यांनी काम केले आहे. सेवा कार्यकाळात त्यांना सुमारे १२० बक्षिसे मीळाली असून रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक हाशिवरे बँकेवरील दरोडेखोर यांना मुद्देमालासह पकडले, गंथन चोरीचे आरोपी, एस.ई. झेड आंदोलन, मोर्चे, धरणे आंदोलन, उपोषणे त्यांनी योग्य पद्धतीने हाताळले आहेत.

पेण तालुक्यात अनेक व्यक्तींशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध असुन यामधूनच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे अनेकवेळा त्यांनी चांगले काम केले आहे. यावेळी अविनाश म्हात्रे यांना सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, पत्रकार, डॉक्टर, वकील, पोलीस कर्मचारी अश्या अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.


## पनवेल महानगरपालिका
### जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी–१ नमुन्यात मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. | अनामत रक्कम रु. | निविदा प्रत किंमत+ १८% विक्री कर= | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, प्रभाग क्र.१०४ मधील खारघर येथील सिडकोकडील सेक्टर १४, वैकुंठधाम स्मशानभूमीची दुरुस्ती करणे | ७,७५,६१६/– (Without GST) | ७८००/– | एकूण निविदा किंमत ५००+९०=५९० | २ महिने |

याकामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दिनांक ०५/०७/२०२१ पासून दि.१९/०७/२०२१ पर्यंत सायं.५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र.१ मध्ये सादर करण्याचा आहे.

२) सिलबंद निविदा दि.२०/०७/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्वीकारण्यात येतील.

३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि.२२/०७/२०२१ रोजी दुपारी ३.३० वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

जा.क्र.पमपा/बांधकाम/४३२१/प्र.क्र.०६/१३४९/२०२१
दि.०२/०७/२०२१

**सही/–**
**(तृप्ती सांडभोर)**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**


## विक्रांत पाटील यांनी त्वरित करून घेतली रस्त्यावरील पडलेल्या डेब्रिजची साफ-सफाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रभाग क्र १८ मधील विकास कामांच्या माध्यमातून सध्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरू आहे.अमरधाम ते वीर सावरकर चौक या रस्त्याचे काँक्रीटीकरण पूर्ण झाले असून रस्त्याच्या दोन्ही बाजूला स्ट्रॉम वॉटर ड्रेन आणि कलवट बांधण्याचे सुरू आहे. लोखंडी पाडा समोरील कलवट बांधण्याच्या वेळी जुने पाईप आणि माती काढण्यात आली होती.

काम पूर्ण झाल्यानंतरही रस्त्यावरील पाईप आणि माती काढण्यात आली नव्हती, त्यामुळे रहदारीस त्रास होत होता आणि लोखंडी पाड्यातील नागरिकांचा येण्या जाण्याचा रस्ता कलवटच्या बाजूने असल्याने त्यांनाही त्रास होत होता.ही बाब लोखंडी पाड्यातील जागरूक नागरिकांनी नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. नगरसेवक विक्रांत पाटील यांनी काँट्रॅक्टरला बोलवून त्वरित साफसफाई करून घेतली. लोखंडी पाडा आणि अशोक नगर मधील नागरिकांच्या समस्या नगरसेवक विक्रांत पाटील तत्परतने सोडवतात याबद्दल रहिवाश्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

